रविवार, १ जानेवारी २०२३

तरुण भारत संवाद

# हळबे महाविद्यालयात 'लष्कर व्यवस्थापन' व्याख्यान



**दोडामार्ग : हळबे महविद्यालयात एनसीसी दिनानिमित्त दीपप्रज्वलन करताना कॅ. प्रसाद गवस. सोबत प्राचार्य डॉ. सुभाष सावंत.**

समीर ठाकुर

दोडामार्ग
वार्ताहर

एन.सी.सी. दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग येथे 'लष्कर व्यवस्थापन' या विषयावर सेवानिवृत्त कॅप्टन प्रसाद गवस यांचा व्याख्यान कार्यक्रम नुकताच झाला.

एन.सी.सी. दिन २७ नोहेंबर रोजी देशभरात शाळा महाविद्यालयात साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग येथे छात्र सैनिकांमध्ये देशभक्तीची प्रेरणा व नवचेतना निर्माण करण्यासाठी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. या वेळी 'भारतीय सैन्य व्यवस्थापन आणि कार्य' या विषयावर कॅप्टन प्रसाद गवस यांचे व्याख्यान झाले. भारतीय सैनिक कार्य पद्धती आणि संपूर्ण व्यवस्थापन यंत्रणा या बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच छात्र सैनिकांना आपल्या कार्य नेतृत्वाची आवड आणि अभिमान असणे गरजेचे आहे. तरच तो या क्षेत्रात आपले योगदान सकारात्मक पद्धतीने देवू शकतो, असे वक्तव्य व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्या शालेय जीवनातील एन.सी.सी.च्या आठवणींना उजाळा दिला. एन.सी.सी. करिअरच्या दृष्टिकोनातून किती महत्वाचे आहे तसेच एन.सी.सी. बी आणि सी प्रमाणपत्र याचे महत्व काय आहे? हे छात्र सैनिकांना सांगितले. आपल्या संघटन नेतृत्वातून देश – समाज सेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. या कार्यक्रमात छात्र सैनिकांचा बी परीक्षा प्रमाणपत्र व रँक देऊन गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक लेफ्ट. प्रा. डॉ. पी. एन. ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिलीप बर्वे यांनी तर आभार प्रा. डॉ. एस. एस. पाडगावकर यांनी मानले.